**वाचा :- शासन निर्णय क्र. एस.सी. वाय 2009/प्र.क्र.137/म.7 दिनांक 02.02.2010**

जा.क्र.2010/जमीन-2/सिआर-09
जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली
दिनांक 28.02.2010 970

**आदेश**

ज्याअर्थी, उपरोक्त शासन निर्णय दिनांक 02.02.2010 नुसार हिंगोली जिल्ह्या मध्ये खरीप पिकांची अंतिम पैसेवारी 50 पैसे व त्या पेक्षा कमी जाहीर करण्यात आलेली आहे. अशा 257 गांवामध्ये टंचाई परिस्थिती जाहिर करण्यात येत आहे. त्याअर्थी,मी. शैला ए. जिल्हाधिकारी हिंगोली टंचाई परिस्थिती जाहिर करण्यात आलेल्या उपरोक्त 257 गांवातील खातेदारांना टंचाई संदर्भात शासनाच्या प्रचलित धोरणानुसार खालील प्रमाणे सवलती देण्यात येत असल्याचे जाहिर करीत आहे. सदर बाबी खालील प्रमाणे आहेत .

1) जमीन महसुलात सुट ,
2) सहकारी कर्जाचे रुपांतर ,
3) विज बिलात 33 1/3 % इतकी सुट.
4) रोहयो अंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथीलता.
5) परिक्षा शुल्कात माफी ,
6) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगीती .

उपरोक्त गांवाची संख्या प्रपत्र 'ब' मध्ये देण्यात येत आहे. संबंधीत अधिकारी यांनी सदर आदेशाची जास्तीत जास्त प्रसिध्दी देवून तात्काळ कार्यवाही करावी.

स्वाक्षरीत/-
(शैला ए.)
जिल्हाधिकारी हिंगोली.

प्रतिलीपी,

1) मा. सचिव महसुल व वन विभाग मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सादर.
2) मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.
3) मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. हिंगोली यांना पुढील कार्यवाहिस्तव.
4) जिल्हा पोलीस अधिक्षक हिंगोली यांना पुढील कार्यवाहीस्तव.
5) कार्यकारी अभियंता, सा.बा. विभाग हिंगोली यांना पुढील कार्यवाहीस्तव.
6) कार्यकारी अभियंता, विद्युत वितरण कंपनी हिंगोली यांना पुढील कार्यवाहीस्तव.
7) उप विभागीय अधिकारी, हिंगोली / वसमत यांना पुढील कार्यवाहीस्तव.
8) तहसीलदार , हिंगोली / कळमनुरी / सेनगांव / वसमत / औंढा ना. यांना पुढील कार्यवाहीस्तव.
9) व्यवस्थापक, मध्यवर्ती सहकारी बँक हिंगोली यांना पुढील कार्यवाहीस्तव.
10) शिक्षणाधिकारी (प्रा / मा.) हिंगोली यांना पुढील कार्यवाहीस्तव.
11) उपजिल्हाधिकारी (रोहयो) हिंगोली यांना पुढील कार्यवाहीस्तव
12) जिल्हा माहिती अधिकारी हिंगोली यांना देवून कळविण्यात येते की, सदर आदेशास जास्तीत जास्त वर्तमान पत्रातुन प्रसिध्दी द्यावी.
13) जिल्हा माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, एन.आय.सी. हिंगोली यांना देवून कळविण्यात येते की, सदरची माहिती जिल्ह्याच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी करावी.

जिल्हाधिकारी हिंगोली करीता

## प्रपत्र ब

ज्या अर्थी शासन निर्णय क्र. एस.सी. वाय-2009/प्रक्र. 137/म-7 दिनांक 02.02.2010 नुसार सन 2009-10 च्या खरीप हंगामातील ज्या गांवाची अंतिम पैसेवारी 50 पैसे वा त्यापेक्षा कमी आलेली आहे, ती गांवे टंचाई ग्रस्त जाहिर करावयाची आहेत.

त्याअर्थी त्या अनुषंगाने मी, शैला ए. जिल्हाधिकारी हिंगोली, खाली नमुद केलेल्या तालुक्या मधील त्यांच्या नांवा समोर दर्शविलेल्या गांवात टंचाई परिस्थीती जाहिर करीत आहे.

| अ.क्र. | तालुका | खरीप पिकांची अंतिम पैसेवाही 50 पैसे वा त्या पेक्षा कमी आलेल्या गांवाची संख्या |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| 1 | कळमनुरी | 107 (गांवे) |
| 2 | सेनगांव | 133 (गांवे) |
| 3 | वसमत | 17 (गांवे) |
| | एकुण | 257 (गावे) |

जिल्हाधिकारी हिंगोली करीता